४(१)(ख)(३)

**<u>उप प्रमुख अभियंता (पापुप्र ) सल्लागार कक्ष</u>**

<u>निर्णय प्रक्रियेमध्ये अनुसरण्यात येणारी सर्वसामान्य कार्यपध्दती</u>

**<u>सर्वसाधारण -</u>**

कार्यकारी अभियंत्यामार्फत उपप्रमुख अभियंत्यांच्या सल्ल्याने सल्लासेवा कंत्राटातील तरतुदींशी निगडित सर्व दैनंदिन तांत्रिक निर्णय घेतले जातात. कंत्राटात अंतर्भूत नसलेल्या बाबींच्या मान्यतेसाठी कार्यकारी अभियंता / उपप्रमुख अभियंता यांच्याकडून सक्षम अधिका-यांच्या म्हणजेच संबंधित खाते प्रमुख -सक्षम उच्च अधिकारी यांच्या मान्यता व मंजुरीसाठी संबंधित लेखा अधिकारी कार्यालयामार्फत प्रस्ताव पाठविला जातो. निर्णय प्रक्रिया संघटनेच्या अधिकार श्रेणीनुसार चालते.

**<u>सर्वसाधारण जनतेशी संबंधित बाबींच्या कामांची निर्णयप्रक्रिया /जनतेला कळविण्याची कार्यपध्दती.</u>**

जल अभियंता विभागाकडून एखाद्या कामाची आवश्यकता /गरज प्रतिपादित झाल्यानंतर / कळविण्यात आल्यानंतर, सदर काम करण्यासाठी आवश्यक असल्यास राज्य शासनाची मान्यता प्राप्त करुन घेण्यात येते. त्यानंतर, सल्लागारांची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत प्रकल्पाचा मूलभूत अभ्यास व सुसाध्यता अहवाल तयार करण्यात येतो. आवश्यक असल्यास वन व पर्यावरण खात्याच्या मंजु-या प्राप्त कराव्या लागतात. धरण प्रकल्प राबविताना प्रचलित कायद्यान्वये भूसंपादन करण्यात येते. तदनंतर, सक्षम अधिका-यांच्या मंजुरीने बोगद्यांच्या कामासाठी सर्व प्रमुख भाषांमधील स्थानिक वर्तमानपत्रात सदर कामाची सार्वजनिक सूचना (Public Notice) प्रसिध्द करण्यात येते. तसेच कामाच्या मार्गरेखनावरील सर्व मालमत्ताधारकांनाही मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमांतील विनिर्दिष्ट तरतुदींनुसार कायदेशीर नोटीसा बजाविण्यात येतात. वरील सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन त्यानंतर निविदांची प्रक्रिया सुरू करण्यात येते.

**सार्वजनिक अधिका-यांकडून महत्वाच्या बाबतीत घेतल्या जाणा-या निर्णयाची माहिती खालीलप्रमाणे:**

| निर्णय घ्यायचा आहे तो विषय | तांत्रिकी | प्रशासकीय | इतर |
|---|---|---|---|
| मार्गदर्शक तत्वे /आदेश (काही असल्यास) | लेखा खात्यांनी वितरित केलेले विशेष निर्देश, मार्गदर्शक तत्वे, सर्वसाधारण अभियांत्रिकी प्रथा,विविध मानके, अभियांत्रिकी संकेत | महानगरपालिका सेवा नियमावली, विविध परिपत्रके | महानगरपालिका सेवा नियमावली आणि राज्य व केंद्र शासनाचे पदसिध्द अधिकारी. |
| कार्यान्वित करण्याची कार्यपध्दती | कंत्राटातील अटींनुसार | मुंबई म.न.पा.अधिनियम<br>अनुसूची<br>उपविधी | काही नाही |

सही/-

०६.०९.२०१८

**उप प्रमुख अभियंता (पापुप्र) स.क.**